नवराष्ट्र

धोरण • बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये; स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षण योजनांसाठी ई-निविदा

# पारदर्शी धोरणामुळे सव्वातीन कोटी रुपयांची बचत

पुणे, (वा.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेद्वारे(बार्टी) शिक्षण योजनेचे कंत्राट पारदर्शकपणे राबविण्यात आल्याने तब्बल सव्वातीन कोटींची बचत झाली असल्याची माहिती बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी दिली. बार्टी ही सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था आहे. या संस्थेमार्फत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांच्या कष्टांना व प्रयत्नांना यशाचे पाठबळ देण्यासाठी प्रशासकीय सेवा (युपीएससी-एमपीएससी), सोबतच नेट, सेट, पोलिस आणि सेनेतील भरतीपूर्व प्रशिक्षण राबवण्यात येते, अशा विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षण योजना राबविण्यासाठी ई-निविदा प्रकाशित करण्यात आल्या होत्या. या सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे राबवण्यात आल्यामुळे यावर्षी या प्रशिक्षण योजनेच्या कंत्राटातून सव्वातीन कोटींची बचत झाली असल्याची सकारात्मक माहिती पुढे आली आहे.

## धम्मज्योती गजभिये जबाबदार अधिकारी

कालानुरुप कीती तरी महासंचालक या पदावरती येतील व जातीलही पण सगळयाचीच दखल कोणी घेत नाही. किंवा ठेवतही नाही. परंतु काही असे अधिकारी असतात. जे समाजाच्या व विद्यार्थ्यांच्या भल्याचा विचार सातत्याने करत असतात. एवढेच नव्हे तर युगप्रवर्तक महापुरुषांच्या विचारांची कास धरुन पुढे जात असतात. त्यात गजभिये सरांचे नाव अग्रस्थानी असेल. चांगले काम करणाऱ्यांवर टिकाटिप्पणी तर होतच असते आणि अडचणी तर येतच असतात. परंतु त्याचा कुठलाही विचार न करता समाजात कधीही भेदभाव न करता त्यावर मात करुन पुढे जात असतात. तसेच कुणालाही कमी अधिक महत्व न देता आपल्या कामाला अधिक महत्व देऊन काम करत असतात.



## मंडणगड पॅटर्न राबविला

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेल्या १३ मातंग परिषदा शोधून काढणे, त्यांचे संशोधन व संकलन करून ग्रंथरूपाने प्रकाशित व्हावे, यासाठी महाराष्ट्रातील तज्ज्ञ अभ्यासकांची अभ्यास समिती गठित करण्यात आली. तसेच वंचित मातंग समाजाला प्रगती आणि विकासाच्या मार्गावर आणण्यासाठी चांगल्या योजना राबविण्यात येत आहेत. राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता ही योजना राबवली. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या काळात सेवा पंधरवडा राबवला. यात ९० हजार ४९७ जात वैधता प्रमाणपत्र देण्यात आले. मंडणगड पॅटर्न मोहिमेनुसार ११ हजार ७६१ जात वैधता प्रमाणपत्र समता पर्वात देण्यात आले.

"डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार व प्रशिक्षण व्हावे, या उद्देशाने बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या कल्याणासाठी योजना राबविण्यात येतात. बेंच मार्क सर्वेक्षण, ५० हजार स्वयंसहाय्यता युवा गट स्थापन केले."

-डॉ. धम्मज्योती गजभिये, महासंचालक-बार्टी.



## पूर्वी हेच दर पन्नास हजारावर

तीन जिल्ह्यांकरिता तांत्रिक गुणांकनात पात्र ठरलेल्या तीन निविदा धारकांपैकी अकोला, बुलढाणा आणि अमरावती येथील संस्थांच्या निविदा सर्वात कमी दराच्या असल्याने त्यांना कंत्राट मिळाले आहे. या संस्थांचे दर अनुक्रमे १२ हजार ९९९ रुपये, १४ संशोधन हजार ९९९ रुपये आणि १२ रजार ९९९ रूयपे असे होते. महाराष्ट्र शासनाचे प्रशिक्षण शुल्काचे एकूण ३ कोटी २७ हजार रुपये यामुळे वाचले. पूर्वी हेच दर पन्नास हजारावर होते, अशी माहिती गजभिये यांनी दिली.